महामानव समजून घेताना... चरित्र ग्रंथमाला

# क्रांतीवीर, पद्मभूषण
# डॉ. नागनाथ अण्णा नायकवडी

डॉ. बाबुराव गुरव

धम्म भवन चॅरिटेबल ट्रस्ट, कोल्हापूर
संवाद प्रकाशन, कोल्हापूर

# भूमिका

धम्म भवन चॅरिटेबल ट्रस्ट ही सामाजिक क्षेत्रात प्रबोधनाचं काम करणारी महत्त्वपूर्ण संस्था असून या संस्थेच्या वतीने सामाजिक प्रबोधनाची चळवळ पुढे चालवण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. जाहीर व्याख्याने, परिसंवाद, चर्चासत्र, साहित्य संमेलन, शिबीर अशा विविध कार्यक्रमांमधून पुरोगामी, परिवर्तनवादी, विज्ञाननिष्ठ, तथागत सिद्धार्थ गौतम बुद्ध, जगत्ज्योती बसवण्णा, छत्रपती शिवाजी महाराज, राष्ट्रमाता जिजाऊ, राजर्षी शाहू महाराज, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, क्रांतीसूर्य भगतसिंग, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे, क्रांतिसिंह नाना पाटील, कर्मवीर भाऊराव पाटील, संत नामदेव ते संत तुकाराम या महामानवांचे विचार लोकांपर्यंत पोहोचावेत ही भूमिका घेऊन संस्था कार्यरत आहे.

महामानव समजून घेताना... या चरित्रग्रंथ मालिके अंतर्गत धम्म भवन चॅरिटेबल ट्रस्ट आणि संवाद प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने एक नवीन उपक्रम आम्ही आपल्या समोर घेऊन येत आहोत. ज्यामध्ये महामानव आणि त्यांचे जीवन व कार्य आपणाला सोप्या भाषेत, कमी वेळेत, वस्तुनिष्ठ पद्धतीने समजावे ही आमची अपेक्षा आहे. अनेक अनुभवी व नव लेखकांकडून महामानवांचे चरित्र लिहून घेण्याचे काम सुरू आहे. ते चरित्र प्रकाशित करणे व कमीत कमी किंमतीमध्ये लहान मुलांपासून मोठ्या व्यक्तीपर्यंत पोहोचविणे या हेतूने आम्ही ही चरित्र ग्रंथमाला सुरू केली आहे.

यामध्ये सिद्धार्थ गौतम बुद्धापासून ते लोकशाहीर अण्णा भाऊ साठे आदी अलीकडील सर्व महामानवापर्यंत या चरित्रग्रंथ मालिकेतून छोट्या छोट्या पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात येणार आहे. या उपक्रमाचा पहिला भाग म्हणून आम्ही चार टप्यामध्ये शंभर महामानवांचे जीवन आणि कार्य या वरती प्रकाशझोत टाकणाऱ्या पुस्तिकांचे प्रकाशन करीत आहोत. ही पुस्तके अल्प किंमतीमध्ये वाचकापर्यंत पोहोचवण्याचा आमचा मानस असून आपण या उपक्रमामध्ये सहभागी व्हावे ही अपेक्षा आहे. या पुस्तिका आपण घ्या! आपल्या घरात आपल्या मुलां-

हुतात्मा किसन अहिर
हुतात्मा नानकसिंग
हुतात्मा बाबुराव कोकाटे
आणि
हुतात्मा प्रताप पाटील
यांना सादर...